नियमित फौजदारी खटला नं.१४३६/२०२१

निशाणी– २१

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ चा जबाब.**

मी शपथेवर कथन करते की,

माझे नांवः– मीर फिरोजा इकबान

वयः– ६७ वर्षे, व्यवसायः घरकाम

नेमणुक – सर्जेपुरा, अहमदनगर.

**सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्री. ए. एस. यादव यांचेकडूनः–**

१. माझ्या घरामध्ये माझी सुन, मुलगा, नातवंडे आणि मी असे राहतोत. घटनेच्या वेळेस मी घासगल्ली कोठला येथे राहत होते. सदरचे घर घटनेच्या आधी शाकीर मुस्ताफा खान यांना भाडयाने दिले होते. साबीर खान आणि जाकीर खान यांना मी ओळखते, ते आमच्या घराच्या शेजारी राहतात. आमचे आणि आरोपीचे घराच्या जागेवरुन पूर्वीपासून वाद होते. दि. १०/१०/२०२१ रोजी दुपारी ३.०० वा. चे सुमारास शाकीर मुस्ताफा खान यांच्या मुलीचा मला फोन आला की, घराकडे येणारा रस्ता साबीर खान याने बांबू आणि जाळी लावून बंद केला आहे. १५ ते २० मिनीटात मी, माझा भाउ आणि मुलगी असे घटनास्थळी गेलो. आम्ही साबीर खान आणि जाकीर खान यांच्याकडे विचारणा केली. शाकीर मुस्ताफा यांची मुलगी इशरत हिने मला आधीच फोनवर सांगितले होते की, साबीर खान याने तिची गचांडी धरली, लज्जा उत्पन्न् होईल असे वर्तन केले आणि त्यात तिचा बुर्खा फाटला, गळयातील चैन तुटली. आम्ही त्यांना समजावून सांगितले असता दोन्ही आरोपींनी आम्हां तिघांना धक्काबुक्की आणि शिवीगाळ केली. त्यानंतर आम्ही पोलिस स्टेशनला येवून तक्रार दिली. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहेत.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपी क्र. १ तर्फे विधीज्ञ श्री एस. एम. गवळी यांचेमार्फत**

२. घासगल्ली येथील घर माझ्या स्वतःच्या नावावर आहे. हे म्हणणे खरे आहे की,

घराचा जो परिसर आहे तो कॅन्टॉनमेंट एरियामध्ये येतो. सदरचे घर आम्ही शेख गुलाम मोहम्मद हाश्यम यांचेकडून खरेदी घेतले. खरेदी करण्यापूर्वी संरक्षण खात्याकडून परवानगी घेतली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर घराची मालकी दाखविणारा उतारा अदयापर्यंत निघाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरची मिळकत खरेदी घेतल्यानंतर आम्ही त्या मिळकतीमध्ये स्वतः कधीही राहिलो नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर मिळकतीपासून आम्ही दुसरीकडे रहायला गेलो. आम्ही दुस–या ठिकाणी रहायला गेलो त्याचा पत्ता सर्जेपुरा, मिलन चौक, कौलारु कॅम्प असा आहे. सदरच्या घरापासून घासगल्लीतील घराकडे चालत जायला साधारणतः पाच मिनीटे लागलात. आम्ही भाडेकरु बरोबर भाडेकरार केलेला नाही.

३. मी आरोपींना ३५ वर्षापासून ओळखते. साबीर पोलिस स्टेशन आणि एक्साईसला कशासदंर्भात अर्ज करतो याची मला माहिती नाही. साबीरच्या अर्जावरुन पोलिसांनी आम्हांला चौकशीकरिता बोलाविले नाही. साबीरच्या तक्रारीवरुन पोलिसांनी आम्हांला चौकशीकरिता कधीच बोलाविले नाही असे म्हणणे योग्य होईल. बाळू खोमणे यांना मी ओळखते. महेबुब इब्राहिम यास मी ओळखत नाही. सोहेल हा माझा मुलगा आहे. आम्ही राहतो तेथे असलेले दारुचे आड्डे कोण चालविते याबाबत मला माहिती नाही. हातभट्टीचा धंदा कोण करत याची आम्ही कधी चौकशी केली नाही. मला मुन्नी म्हणून ओळखतात. बाळू खोमणे हा नेहमी कोर्टात येतो व त्याच्यावर काही केसेस चालू आहेत याबाबत मला माहिती नाही. बाळू खोमणे हा हातभट्टी चालवितो आणि त्याच्यावर न्यायालयात खटले आहेत याबाबत मला सांगता येत नाही. ईम्तीयाज शेख हा माझा मोठा भाउ आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या छत्रछायेखाली बाळू खोमणे दारुच्या सर्व भट्टया चालवितो. साबीर १२–१३ वर्षापासून दारु भट्टया बंद करा म्हणून माझ्याविरुध्द आणि माझ्या कुटुंबियाविरुध्द तसेच बाळू खोमणे विरुध्द अर्ज करत आहे याबाबत मला माहिती नाही.

४. जागेवरुन आरोपींसोबत वाद आहे असे दाखविणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही.

**प्रश्नः** दि. १०/१०/२०२१ रोजी २.०० ते २.१५ वा. चे दरम्यान बाळू खोमणे यांनी तुम्हांला का फोन केला होता ?

**उत्तरः** मला फोन आला नव्हता.

५. ईशरतचा फोन नंबर मला सांगत येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, इशरतनी मला फोन केला असे दाखविणारा कोणताही पुरावा मी तपासी अंमलदार यांना दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, फोन आल्याबाबतचा पुरावा मी तपासी अंमलदार यांना देवू शकत होते. हे म्हणणे खरे नाही की, मला इशरतचा फोन आला नव्हता परंतू बाळू खोमणेचा फोन आला होता म्हणून मी तसा पुरावा तपासी अंमलदाराला दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, घासगल्लीतील घराकडे जाण्याकरिता रस्ता नसून दोन ते अडीच फुटाची बोळ आहे. साक्षीदार पुन्हा सांगते की, ४–५ फुटाची वाट आहे. घासगल्लीतील घराशेजारी, घराच्या पुढे आणि समोर अनेक लोक राहतात. हे म्हणणे खरे आहे की, रस्ता बंद केल्याची तक्रार पुढे राहणा–यांनी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, रस्ता कोणी बंद केला नसल्यामुळे कोणाची तक्रार नव्हती. मला फोन आल्यानंतर आसीफ, निकी, ईशरत आणि तिचे वडील शाकीर असे लोक घटनास्थळी होते. हे म्हणणे खरे आहे की, घासगल्लीतून आत आल्यानंतर डावीकडे वळाल्यास आरोपीचे घर लागते आणि सरळ गेल्यास माझे घर लागते. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या २–४ दिवस आधी महानगरपालिकेचे ड्रेनेजचे काम चालू होते व त्यांनी ड्रेनेजसाठी खोदकाम केले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे काम दि. २८/०९/२०२१ ते दि. १५/१०/२०२१ पर्यंत चालू होते. हे म्हणणे खरे नाही की, ड्रनेजचे काम चालू होते तेव्हा ड्रेनेजचा वास येवू नये म्हणून जुलेखा इरफान खान हिने चादर लावली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदरची चादर बाळू खोमणे याने काढायला लावली होती परंतू तिने काढली नाही म्हणून बाळू खोमणे याने मला फोन केला होता. मी, माझी मुलगी, आसीफ, ईशरत आणि तिचे वडील शाकीर असे तेथे जमले. मी नसीमला ओळखते. हे म्हणणे खरे नाही की, सोहेलने नसीमच्या पाठीत लाथ मारली आणि तिला खाली पाडले. हे म्हणणे खरे नाही की, सोहेलने जुलेखाचे केस आणि हात धरला आणि तिला लज्ञा उत्पन्न होईल असे वर्तन केले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस आम्ही असे म्हणालो की, साबीरच्या घरच्या लोकांना ठार मारु असे ठरविले आणि तशी धमकी दिली. हे म्हणणे खरे नाही की, माझा जावई पोलिस असल्यामुळे त्याचा धाक दाखवून आम्ही धमकी दिली. जुलेखा हिने आम्हा नउ जणांच्या विरुध्द तोफखाना पोलिस स्टेशन येथे गु.र.क्र. ९००/२०२१ ची फिर्याद दाखल केली याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्याविरुध्द या न्यायालयात एक केस प्रलंबित आहे त्यामध्ये आम्ही नउ जण आरोपी आहेत. साबीर हा आमच्याविरुध्द तक्रार करतो, पोलिसांना भडकावून देतो, आत्मदहनाची धमकी देतो या कारणावरुन आमचा आणि

भाडेकरुचा साबीरवर राग आहे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, साबीर आणि त्याच्या भावाचा बंदोबस्त करायचा या उद्देशाने आम्ही ईशरतला खोटी फिर्याद दयायला लावली. हे म्हणणे खरे आहे की, फोन येण्यापूर्वी घटनास्थळी नेमके काय झाले याबाबत मला वैयक्तीक माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी माझा जबाब नोंदविला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांना सांगितले नव्हते की, ईशरतने मला फोनवर हकीगत सांगितली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील मजकूर खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ आणि २ चा मी कथन केल्याप्रमाणे घटनेशी काहीही संबंध नाही.

## उलटतपास आरोपी क्र. २ तर्फे विधीज्ञ श्री एस. के. शेख यांचेमार्फत

६. आरोपी क्र. १ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास आरोपी क्र.२ चा उलटतपास म्हणून स्वीकारण्यात आला.

७. हे म्हणणे खरे नाही की, ईशरत माझी नातेवाईक आहे. ईशरत भाडेकरुची मुलगी आहे. मी माझ्या घराची इंडेक्सची प्रत पोलिसांना दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, इंडेक्सची प्रत १९८५ ची असून ती झेरॉक्स प्रत होती. हे म्हणणे खरे नाही की, घर क्र. १२०२ अस्तीत्वात नाही आणि बनावट दस्त बनविले. सदर घराची नोंद टीपी स्कीम, कॅन्टॉनमेंट किंवा महानगरपालिकेकडे नाही याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याविरुध्द यापूर्वी दारुच्या केसेस दाखल होत्या. गु.र.क्र. ९००/२०२१ मधील सर्व आरोपींविरुध्द दारुच्या केसेस आहेत याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

समक्ष,

( राजेंद्र शां. रोटे )

दि. १७/०२/२०२५. मुख्य न्यायदंडाधिकारी

अहमदनगर. अहमदनगर.